प्रशासकीय अधिकारी, नियोजन अधिकारी, अर्थसंकल्प अधिकारी व वसुली अधिकारी महा. मत्स्यव्यवसाय सेवा, गट - ब (प्रशासकीय) (राजपत्रित) आणि सहायक प्रशा. अधिकारी, गट - ब भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा या दोन्ही पदांकरीता सामायिक चाळणी परीक्षा - २०१८ . दि २९ जुलै, २०१८

**प्रश्नपुस्तिका क्रमांक**
**BOOKLET No.** 101781

2018

**प्रश्नपुस्तिका** **N11** **संच क्र.** **A**

## चाळणी परीक्षा/SCREENING TEST

**वेळ : 1 (एक) तास**

**एकूण प्रश्न : 50**
**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार पर्यायांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृति करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनाधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. खालीलपैकी कोणते विधान *असत्य* आहे ?
   (1) राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने राज्य सूचीतील विषयावर संसदेने कायदा करणे गरजेचे आहे, असा ठराव राज्यसभेने केल्यास संसद त्या विषयावर कायदा करू शकते.
   (2) राष्ट्रीय आणीबाणी घोषित झाल्यानंतर राज्यसूचीतील विषयाबाबत कायदे करण्याचा अधिकार संसदेला मिळतो.
   (3) जेंव्हा दोन किंवा अधिक राज्यांनी राज्यसूचीतील विषयावर संसदेने कायदा करावा, अशी विनंती करणारा ठराव संमत केल्यास संसद कायदा करू शकते व तो कायदा संपूर्ण देशभर लागू होतो.
   (4) यापैकी कोणतेही नाही

---

2. घटनात्मक दृष्ट्या राज्यपालाचे खालीलपैकी कोणता/ते विवेकाधिकार *नाही/त* ?
   अ. विधेयक राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवणे.
   ब. जेंव्हा राज्यविधीमंडळाचे अधिवेशन चालू नसते तेंव्हा अध्यादेश काढणे.
   क. विधान परिषदेवर सदस्य नामनिर्देशित करणे.
   ड. मंत्रिमंडळाने बहुमत गमावले असता विधानसभा विसर्जित करणे.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त क (2) फक्त अ, ब आणि क
   (3) फक्त ब, क आणि ड (4) फक्त ब आणि क

---

3. ____________ ही भारताची पहिली V-SAT वर आधारित कम्युनिकेशन नेटवर्क जे, रिअल टाईम डेटा ॲपलिकेशन वापरून पॉवर निर्माण व वितरण करते.
   (1) नेट विद्युत (2) विद्युत सॅट
   (3) विद्युत नेट (4) विसॅट विद्युत

---

4. ई पंचायत प्रकल्पा अंतर्गत राज्यातील जिल्हा परिषद, ग्राम पंचायतींना संगणक, प्रिंटर व स्कॅनर ने जोडणारी ____________ ही सेवा महाऑनलाईन डिजीटल महाराष्ट्र अंतर्गत उपलब्ध आहे.
   (1) ई सुविधा (2) इ-राज्य
   (3) संग्राम केंद्र (4) इ-ग्राम

---

5. महिलासंदर्भात भेदभाव दूर करणे आणि त्यांना समान अधिकार व स्वातंत्र्य बहाल करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने 1979 साली कोणते दस्तऐवज स्वीकृत केले ?
   अ. डिक्लेरेशन ऑन द इलिमिनेशन ऑफ डिस्क्रीमिनेशन अगेंस्ट वुमेन
   ब. कन्वेंशन ऑन द इलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रीमिनेशन अगेंस्ट वुमेन
   क. कन्वेंशन ऑन द नॅशनॅलिटी ऑफ मॅरिड वुमेन
   ड. कन्वेंशन ऑन द पॉलीटिकल राईट्स ऑफ वुमेन

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त अ (2) फक्त ब
   (3) फक्त अ आणि क (4) फक्त अ, ब आणि ड

---

6. मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993 प्रमाणे राज्य शासन प्रत्येक मानवी हक्क न्यायालयासाठी, त्या न्यायालयातील प्रकरणाचे कामकाज पार पाडण्यासाठी एक सरकारी वकील विनिर्दिष्ट करील किंवा ________ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधी साठी वकीली व्यवसाय करीत असलेल्या एखाद्या वकीलाची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक करील.

(1) 4 वर्षे (2) 5 वर्षे (3) 7 वर्षे (4) 10 वर्षे

7. खालीलपैकी कोणते विधान ***चूकीचे*** आहे ?

(1) महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे त्वरित निकालात काढण्यासाठी महाराष्ट्रात 27 विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत.

(2) बलात्कार व ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला/बालक यांना अर्थसाहाय्य करणारी 'मनोधैर्य योजना महाराष्ट्रात महिला व बाल कल्याण विभागाकडून राबविण्यांत येत आहे.

(3) महिलांना त्यांच्या तक्रारीबाबत तातडीने पोलीस मदत मिळण्यासाठी मुंबई, नवी मुंबई व ठाणे शहरांसाठी टोल फ्री दुरध्वनी क्रमांक 1091 व उर्वरित महाराष्ट्रासाठी 103 हा दुरध्वनी क्रमांक सुरू करण्यांत आला आहे.

(4) संपूर्ण देशात आपत्कालीन सेवा 112 या क्रमांकावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प केन्द्र शासनाने सुरू केला आहे.

8. खालील विधाने विचारात घ्या :

अ. केन्द्र शासनाने आई-वडील, ज्येष्ठ नागरीक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, 2007 पारित केला आहे.

ब. हा अधिनियम महाराष्ट्रात दि. 1 मार्च 2009 पासून लागू करण्यांत आला.

क. हा अधिनियम जम्मू-काश्मिर सह संपूर्ण भारतातील व भारताबाहेरील भारतीय ज्येष्ठ नागरिकांना लागू आहे.

ड. या अधिनियमानुसार निर्वाह भत्ता निश्चित करण्यासाठी न्यायाधिकरण गठित करण्यांत आले आहे.

वरीलपैकी कोणती विधाने ***बरोबर*** आहेत ?

(1) फक्त अ, ब आणि क (2) फक्त ब, क आणि ड
(3) फक्त अ, ब आणि ड (4) फक्त अ, क आणि ड

9. जागतिक आनंदी निर्देशांक (World Happiness Index) 2018 बाबत खालील विधाने विचारात घ्या :

अ. सदरचा अहवाल हा युनोच्या सस्टेनेबल डेव्हलोपमेंट सोल्यूशन नेटवर्क द्वारा प्रकाशित केला जातो.

ब. भारताचे स्थान 156 देशांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत 122 व्या स्थानावरुन 11 ने घसरुन 133 वे झाले आहे.

क. अफगाणिस्तान वगळता भारताचे स्थान हे बहुतांश सार्क देशांच्या खाली आहे.

ड. सदरहू निर्देशांकानुसार नॉर्वे हा जगातील सर्वाधिक आनंदी देश आहे.

वरीलपैकी कोणती विधाने ***बरोबर*** आहेत ?

(1) फक्त अ, ब आणि क (2) फक्त ब, क आणि ड
(3) फक्त ब आणि ड (4) वरील सर्व

10. 2018 चा नोबल पुरस्कार यासाठी दिला जाणार ***नाही***

(1) साहित्यासाठी (2) रसायनशास्त्रासाठी
(3) भौतिकशास्त्रासाठी (4) अर्थशास्त्रासाठी

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

11. जर EQI = 173, SCO = 806 तर 257 = ?

(1) MGQ

(2) BEP

(3) GMQ

(4) MQS

12. एक व्यक्ती 9 किमी उत्तरेकडे प्रवास करतो. नंतर 12 किमी पश्चिमेकडे व त्यानंतर 15 किमी दक्षिणेकडे जातो. तर तो सुरवातीच्या स्थळापासून किती किमी दूर आहे ?

(1) $6\sqrt{5}$ किमी

(2) $1\sqrt{4}$ किमी

(3) $5\sqrt{5}$ किमी

(4) $4\sqrt{3}$ किमी

13. एका सांकेतिक भाषेत 573 चा अर्थ 'bring cold water' असा होतो. 342 चा अर्थ 'water is good' असा होतो व 'bright boy good' यासाठी 126 असा संकेत वापरतात. तर, 'boy is bright' साठी कोणते संकेत येतील ?

(1) 671

(2) 475

(3) 641

(4) 376

14. पुढील आकडेवारी चा अभ्यास करून सरासरी वेतन व न्यूनतम वेतन मधील अंतर सांगा.

| *व्यक्ति* | *वेतन ₹ लाख मध्ये* |
|---|---|
| A | 8·5 |
| B | 7·6 |
| C | 12·8 |
| D | 5·4 |
| E | 10·5 |

**पर्यायी उत्तरे :**

(1) 4·20

(2) 2·65

(3) 3·65

(4) यापैकी नाही

15. स्थायी पद धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याचा धारणाधिकार कोणत्या परिस्थितीत अबाधित राहतो ?
(1) अस्थायी पदावरील बदली
(2) स्वीयेतर सेवेत असताना
(3) निलंबनाधीन असताना
(4) वरील सर्व

16. शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासून ________ वर्षाच्या कालावधीपर्यंत, शासकीय कर्मचाऱ्यास आपल्या सेवापुस्तकातील जन्मतारीख योग्य पुरावा सादर करून बदल करणाची विनंती करता येते.
(1) तीन
(2) सात
(3) पाच
(4) चार

17. कार्यालय प्रमुखाने कार्यालयातील सेवापुस्तके व सेवापट (पोलीस हवालदार व पोलीस शिपाई वगळून) यांची वार्षिक पडताळणी प्रत्येक वर्षाच्या ________ करावी.
(1) जानेवारी महिन्यात
(2) डिसेंबर महिन्यात
(3) मे महिन्यात
(4) ऑक्टोबर महिन्यात

18. वेतन या संज्ञेत पुढीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश होतो ?
अ. वैयक्तिक वेतन
ब. विशेष वेतन
क. शासनाकडून वेतन म्हणून खास वर्गीकृत करण्यात येईल अशी इतर कोणतीही वित्तलब्धी
ड. यापैकी काही नाही

**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त अ
(2) फक्त अ आणि ब
(3) फक्त अ, ब आणि क
(4) वरील सर्व

19. विशेष वेतन केव्हा अनुज्ञेय असते ?
अ. विशेष जिकरीच्या स्वरूपाची कर्तव्ये
ब. कामामध्ये किंवा जवाबदारीमध्ये विशिष्ट वाढ
क. शैक्षणिक अर्हतेमध्ये वाढ

**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त अ बरोबर
(2) फक्त अ आणि ब बरोबर
(3) फक्त ब आणि क बरोबर
(4) वरील सर्व

20. दिनांक 1 जानेवारी 2018 रोजी (म.पू.) नियुक्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यास पुढील वेतनवाढ ________ दिवशी मिळेल.
(1) 1 जानेवारी 2019
(2) 1 जुलै 2018
(3) 1 डिसेंबर 2018
(4) 1 जुलै 2019

**21.** राज्याचा एकत्रित निधी म्हणजे

(1) राज्य शासनाला प्राप्त झालेल्या महसूलाच्या सर्व रकमा

(2) राजकोष पत्रांच्या विक्रीद्वारे उभारलेली सर्व कर्जे व अर्थोपाय अगाऊ रकमा

(3) कर्जाच्या परतफेडीच्या रूपाने शासनाकडे जमा झालेला पैसा

(4) वरीलपैकी सर्व

---

**22.** एकाच ठिकाणी प्रत्यक्ष कार्यालय बदलते तेव्हा जास्तीत जास्त ________ पदग्रहण अवधी अनुज्ञेय असतो.

(1) तीन दिवसांचा (2) एक दिवसांचा

(3) चार दिवसांचा (4) सात दिवसांचा

---

**23.** गर्भस्त्राव किंवा गर्भपात आणि गर्भसमापन अधिनियम 1971 अन्वये घडवून आणलेला गर्भपात यांच्या बाबतीत अनुज्ञेय रजा ________ आठवडयांपेक्षा अधिक होता कामा नये.

(1) सहा (2) चार

(3) पाच (4) सात

---

**24.** रजा वेतनाच्या सममूल्य रोख रकमेचा हिशेब करताना वेतनावर अनुज्ञेय असणाऱ्या ________ चा समावेश असेल.

(1) स्थानिक पूरक भत्ता (2) घरभाडे

(3) महागाई भत्ता (4) वरीलपैकी सर्व

---

**25.** खालीलपैकी कोणत्या शासकीय कर्मचाऱ्यास अध्ययन रजा मंजूर करता येणार ***नाही*** ?

(1) पांच वर्षापेक्षा कमी सेवा झाली असेल (2) दहा वर्ष सेवा झालेली आहे

(3) पंधरा वर्ष सेवा झालेली आहे (4) सहा वर्ष सेवा झालेली आहे

---

**26.** ________ हे कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला नियम 5 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा करू शकतील.

(1) मुख्यमंत्री (2) राज्यपाल (3) विभागाचे मंत्री (4) विभागाचे सचिव

---

**27.** म.ना. से (निवृत्ती वेतन) नियम, 1982 मधील नियम 10 अन्वये

अ. शासकीय कर्मचारी तीन महिन्यांहून कमी कालावधीची स्वेच्छा निवृत्तीची नोटीस स्वीकारण्याविषयी, समुचित प्राधिकाऱ्याला लेखी विनंती करू शकेल.

ब. अशा शासकीय कर्मचाऱ्याला, अशा प्राधिकाऱ्याची स्पष्ट मान्यता असल्याखेरीज, अशी नोटीस मागे घेण्यास प्रतिबंध असेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ योग्य ब अयोग्य (2) अ अयोग्य ब योग्य

(3) अ आणि ब योग्य (4) अ आणि ब अयोग्य

28. पुढीलपैकी कोणती शिक्षा जबर शिक्षा आहे ?
   (1) पदोन्नती रोखून ठेवणे.
   (2) वेतनवाढ रोखून ठेवणे.
   (3) शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक स्वरूपाच्या हानीची संपूर्ण रक्कम कर्मचाऱ्याच्या वेतनामधून वसूल करणे.
   (4) वेतन समयश्रेणीतील खालच्या टप्पावर आणणे.

---

29. म.ना.से (शिक्षा व अपील) अंतर्गत खालीलपैकी कोणत्या आदेशा विरुद्ध अपील करता येते ?
   अ. म.ना.से (शिक्षा व अपील) नियम 1979 नियम 4 अन्वये काढलेला निलंबन आदेश
   ब. म.ना.से (शिक्षा व अपील) नियम 1979 नियम 5 मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा आदेशावर
   क. म.ना.से (शिक्षा व अपील) नियम 1979 नियम 5 अन्वये केलेली कोणतीही शिक्षा वाढवणारा आदेश
   ड. राज्यपालांनी काढलेला कोणताही आदेश

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त अ
   (2) फक्त अ आणि ब
   (3) फक्त अ, ब आणि क
   (4) वरील सर्व

---

30. कोणताही शासकीय कर्मचारी त्याने धारण केलेल्या कोणत्याही न्यायिक किंवा कार्यकारी पदामुळे कोणतेही खाजगी प्रकरण कोणत्याही स्वरूपात त्याच्यापुढे आल्यास अशा वेळी तो कर्मचारी
   (1) लवाद म्हणून काम करू शकतो.
   (2) लवाद म्हणून काम करण्यासाठी शासनाची परवानगी घेईल.
   (3) लवाद म्हणून काम करू शकणार नाही.
   (4) वरीलपेक्षा वेगळे उत्तर आहे.

---

31. शासकीय कर्मचारी याने स्वत:च्या नावाने किंवा त्याच्या कुंटुंबियाच्या नावाने केलेल्या किती मुल्याच्या जंगम मालमत्तेचा व्यवहार विहिन प्राधिकरणास कळवेल ?
   (1) दोन महिन्यांच्या मूळ वेतनापेक्षा अधिक
   (2) तीन महिन्यांच्या मूळ वेतनापेक्षा अधिक
   (3) ₹ 10,000 पेक्षा जास्त
   (4) ₹ 20,000 पेक्षा जास्त

---

32. म.ना.से (वर्तणूक) नियमान्वये गट 'क' व 'ड' च्या कर्मचाऱ्यासांठी विहीत प्राधिकरण याचा अर्थ
   (1) कार्यालय प्रमुख
   (2) आस्थापना प्रमुख
   (3) विभाग प्रमुख
   (4) विभागाचे मंत्री

---

**33.** ज्येष्ठता नियम शिथिल करण्याचा अधिकार केव्हा प्राप्त होईल ?

अ. जी पदे आयोगाच्या कक्षेतील असतील.

ब. आयोगाच्या कक्षेतील पदांबाबत आयोगांशी विचारविनिमय केल्यानंतर.

क. नियमांची अंमलबजावणी केल्यामुळे कोणत्याही एका किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना गैरवाजवी तोशीस ज्येष्ठतेबाबत सोसावी लागत असल्यास.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ब आणि क बरोबर (2) फक्त अ आणि ब बरोबर

(3) फक्त क बरोबर (4) एकही बरोबर नाही

---

**34.** खालीलपैकी कोणते उदाहरण भारीत खर्चाचे ***नाही*** ?

(1) राज्यपालांच्या वित्तलब्धी व भत्ते (2) उच्च न्यायालयांच्या न्यायाधिशांचे वेतन व भत्ते

(3) राज्य लोकसेवा आयोगाचा खर्च (4) सचिवांचे वेतन व भत्ते

---

**35.** अर्थसंकल्पीय अंदाज "________" या पुस्तकात प्रकाशित करतात.

(1) ग्रीन बुक (2) व्हाईट बुक (3) ब्लू बुक (4) यलो बुक

---

**36.** मानीव तारीख म्हणजे

अ. सक्षम प्राधिकाऱ्याने नेमणूक तारखेपेक्षा वेगळी नेमून दिलेली तारीख.

ब. एकाच तुकडीत निवड झालेल्यांपैकी वरच्या क्रमावरील व्यक्ती कनिष्ठ क्रमावरील व्यक्तीनंतर कामावर रुजू झाली असेल, तर कनिष्ठ क्रमावरील व्यक्तीची तारीख देणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ बरोबर (2) फक्त ब बरोबर

(3) अ आणि ब दोन्ही बरोबर (4) अ आणि ब चूक

---

**37.** कोणतेही पद संवर्ग किंवा सेवा याबाबतीत अखंड सेवा म्हणजे

अ. एखाद्या व्यक्तीने त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत असताना केलेली अखंडपणे सेवा.

ब. एखाद्या व्यक्तीने कोणत्याही वरच्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत राहून खालच्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत प्रत्यावर्तन न होता अखंडपणे केलेली सेवा.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ बरोबर (2) फक्त ब बरोबर

(3) अ आणि ब दोन्ही बरोबर (4) अ आणि ब चूक

---

**38.** महाराष्ट्र विधानमंडळाशी संबंधित तारांकित किंवा अल्पमुदतीच्या सूचनेच्या प्रश्नाकरिता विभागीय प्रभारी मंत्र्यांसाठी जादा माहिती कोणत्या शिर्षाखाली एका स्वतंत्र पानावर देण्यात येते ?

(1) गोपनीय टिप्पणी (2) महत्त्वाची टिप्पणी

(3) पुरवणी प्रश्नाकरिता टिप्पणी (4) सर्वसाधारण टिप्पणी

39. 'क' वर्ग नुसत्या ________ वर्षासाठी परिरक्षण करावयाच्या असतात.
(1) दोन
(2) तीन
(3) पांच
(4) अनिश्चित काळाकरिता

40. महत्त्वाच्या आदेशांचा सारसंग्रह हा वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून ________ महिन्यांच्या आत छापून घ्यावा.
(1) एक
(2) दोन
(3) तीन
(4) चार

41. शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम 2013 अन्वये अंतिम निर्णय घेण्यासाठी अधिकारांचा स्तर निर्धारित करण्याची बाब कोणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल ?
(1) मुख्यमंत्री
(2) विभागाचे सचिव
(3) मुख्य सचिव
(4) विभागाचे संबंधित प्रभारी मंत्री

42. शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम 2013 अन्वये नागरिकांची सनद तयार करून प्रसिद्ध करण्याची जबाबदारी कोणाची असेल ?
(1) प्रशासकीय विभाग प्रमुख
(2) प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख
(3) (1) व (2) दोन्ही बरोबर
(4) वरीलपैकी एकही बरोबर नाही

43. विशेष अनुमति याचिका किंवा प्रतिज्ञापत्र शासनाच्यावतीने दाखल करण्याबाबतची कार्यवाही कोणत्या कार्यालयामार्फत करण्यात यावी ?
(1) सरकारी वकील, सर्वोच्च न्यायालय
(2) सरकारी अभियोक्ता, उच्च न्यायालय
(3) इतर वकीलामार्फत
(4) यापैकी नाही

44. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यापूर्वी खालीलपैकी कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे ?
अ. प्रकरण अपील करण्याजोगे आहे किंवा कसे याबाबत सरकारी वकीलाचे अभिप्राय घेणे.
ब. नोडल अधिकाऱ्याने मा. न्यायालयाने दिलेले आदेश/निदेश विभागप्रमुखाचे निदर्शनास आणण्याची गरज नाही.
क. प्रस्ताव तपासुन आवश्यक त्या कागदपत्रासह विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेणे.
ड. सरळ मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करणे.

**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त अ आणि ब
(2) फक्त अ आणि क
(3) फक्त अ, ब आणि क
(4) फक्त ड

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

45. रँड वधाची तुलना अफझलखानाच्या वधाबरोबर कोणी केली ?
(1) लाला लजपतरॉय (2) बिपीन चंद्र पाल
(3) नेताजी सुभाषचंद्र बोस (4) लोकमान्य टिळक

46. सर सय्यद अहेमदखान यांनी जी 'अलीगढ विचार प्रणाली' निर्माण केली तिचे अर्ध्वयू खालीलपैकी कोण होते ?
अ. चिराग अली
ब. अल्ताफ हुसैन
क. नझीर अहमद
ड. मौलाना शिब्ली नोमानी
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त अ, ब आणि क (2) अ, ब, क आणि ड
(3) फक्त ब, क आणि ड (4) फक्त अ, ब आणि ड

47. खालील विधानांची सत्यता तपासा :
*विधान अ :* वनस्पती या हवामानाचे निर्देशक असतात.
*विधान ब :* बाभूळ ही वनस्पती या थंड आणि दमट हवामानाचे निर्देशक आहे.
**पर्यायी उत्तरे :**
(1) विधान अ हे बरोबर असून विधान ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण आहे
(2) विधान अ हे बरोबर असून विधान ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण नाही
(3) विधान अ आणि ब दोन्ही सत्य आहेत
(4) विधान अ आणि ब दोन्ही असत्य आहेत

48. दक्षिणेकडून उत्तरेकडे जाताना खाड्यांचा योग्य क्रम असलेला पर्याय शोधा.
(1) देवगड – दाभोळ – धरमतर – मनोरी (2) मनोरी – धरमतर – दाभोळ – देवगड
(3) धरमतर – मनोरी – देवगड – दाभोळ (4) दाभोळ – देवगड – मनोरी – धरमतर

49. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे राज्य माहिती आयोग पुढील व्यक्तीचा मिळून बनलेला असेल
अ. राज्य मुख्य माहिती उपायुक्त, आणि
ब. गरज असतील त्या प्रमाणे, __________ पेक्षा अधिक नसतील, इतके राज्य माहिती आयुक्त.
**पर्यायी उत्तरे :**
(1) 5 (2) 7 (3) 10 (4) 3

50. माहिती अधिकार अधिनियम 2005 सुचि क्र. 2 अन्वये जर, संबंधीत माहिती ही. 'मानवी अधिकारांचे उल्लंघन' या संबंधात असेल तर ती __________ दिवसात पुरविण्याची तरतूद आहे.
(1) 42 दिवस
(2) 45 दिवस
(3) 54 दिवस
(4) 30 दिवस

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदू कोण ?

(1) शिक्षण संस्था  (2) शिक्षक

(3) विद्यार्थी  (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" हे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

## कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK